महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.मासंवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २६४७५९९५
फॅक्स क्रमांक ०२२-२६५८०६४२

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३७३ दिनांक १७ / १२ / २०११

विषय : राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त या पदनामाचा उल्लेख योग्य तऱ्हेने करण्याबाबत.

संदर्भ : कक्ष अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.४७२/प्रशा-४ दि.०२.१०.२०११.

.....

संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कार्यासन अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांच्या संदर्भिय पत्रान्वये उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.रामाआ २००९/१२३८/प्र.क्र.५४१/सहा दि.०९.११.२०११ च्या परिपत्रकाची प्रत या कार्यालयास प्राप्त झाली असून ती सोबत जोडली आहे.

२. सदर शासन परिपकान्वये असे कळविले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार सद्यस्थितीत राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई व राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई, कोकण विभाग (नवी मुंबई), पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती यांची कार्यालये अस्तित्वात आहेत. राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, 'राज्य माहिती आयुक्त' या पदनामाचा उल्लेख शासकीय पत्रव्यवहारात बऱ्याच वेळा विभागीय आयुक्त असा करण्यात येतो. 'राज्य माहिती आयुक्त' व 'विभागीय आयुक्त' ही पदनामे पुर्णतः भिन्न असल्यामुळे असे निर्देश देण्यात आले आहेत की, यापुढे या पदनामाचा राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई व राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई, कोकण विभाग (नवी मुंबई), पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती असा उल्लेख करावा.

३. याबाबत उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.रामाआ २००९/१२३८/प्र.क्र.५४१/सहा दि.०९.११.२०११ चे अवलोकन करून त्यात नमूद सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(एस.एम.कालेवाड)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc
17/12/2011

३|५

**राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त या पदनामांचा उल्लेख योग्य रितीने करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**शासन परिपत्रक क्रमांक - रामाआ २००९/१२३८/प्र.क्र.५४१/सहा,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - ९/११/२०११.**

**परिपत्रक :-**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १५(१) अन्वये महाराष्ट्र राज्य माहिती आयोग गठित करण्यात आलेला आहे. या अधिनियमाच्या कलम १५(२) नुसार राज्य माहिती आयोगावर एक मुख्य माहिती आयुक्त आणि आवश्यक असतील त्याप्रमाणे, दहापेक्षा अधिक नसतील इतके राज्य माहिती आयुक्त नेमण्याची तरतूद आहे. कलम १५(७) नुसार राज्य माहिती आयोगास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने राज्यात अन्य ठिकाणी कार्यालये स्थापन करण्याची शक्ती प्रदान करण्यात आली आहे. आयोगाच्या प्रस्तावानुसार शासनाने राज्यात विविध ठिकाणी आयोगाची कार्यालये स्थापन केली आहेत. सर्वसामान्य जनतेच्या सोयीसाठी राज्य शासनाने महसूल विभागनिहाय आयोगाची कार्यालये स्थापन केली आहेत. तर मुंबई येथील कामाचा व्याप लक्षात घेवून बृहन्मुंबई क्षेत्राकरिता स्वतंत्र कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.

२. सद्यस्थितीत राज्य मुख्य माहिती आयुक्त मुंबई व राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई, कोकण विभाग ( नवी मुंबई ), पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती यांची कार्यालये अस्तित्वात आहेत. राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की,

"राज्य माहिती आयुक्त" या पदनामाचा उल्लेख शासकीय पत्रव्यवहारात ब-याच वेळा "विभागीय आयुक्त " असा करण्यात येतो.



प्रधान सचिव
(उद्योग)

३. " राज्य माहिती आयुक्त " व " विभागीय आयुक्त " ही पदनामे पूर्णत: भिन्न असल्याने यापुढे या पदनामांचा राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई व राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई,नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व अमरावती असा उल्लेख करण्याबाबत आपल्या विभागास व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालयांना , सार्वजनिक प्राधिकरणांना कळविण्यात यावे.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११११०३१६२०००००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सि.मं.इनामदार )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा.मुख्यमंत्री/ मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव
सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई शहर / कोकण विभाग / पुणे विभाग / औरंगाबाद विभाग / नागपूर विभाग / अमरावती विभाग
सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व मंडळे / महामंडळे व शासनाचे सर्व सार्वजनिक उपक्रम सर्व महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषदा
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती कार्यासन -सहा

एच-२२७८ --१३।०
D:\MILIND\G.R. regarding Sumptury allowance.lwp